पिंडकेपार लघु पाटबंधारे योजना ता.व जि.
गोंदिया या योजनेस द्वितीय सुधारीत प्रशासकीय
मान्यता प्रदान करण्याबाबत

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ , नागपूर

महामंडळाचा निर्णय क्र.०२ /विपाविम/कातां.२/पिंडकेपार ल.पा.प्रकल्प/द्वितीय सुप्रमा/(धा.क्र. ३८/१८),
दिनांक : ०२/०१/२०१९

**पहावे :** महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/(३५/२०१५)/जसं(अ), मंत्रालय, मुंबई, दिनांक ९ सप्टेंबर २०१५

पिंडकेपार लघु पाटबंधारे योजना ता व जि. गोंदिया या योजनेस शासन निर्णय क्र.१०८२/५९४/ १३०/८२/ लपा-२, दिनांक १५.१.१९८३ अन्वये अंदाजित खर्च रु.२४२.५९२ लक्ष इतक्या किंमतीस (दरसूची १९८२-८३ वर आधारित) मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

तद्नंतर शासन निर्णय क्रमांक लपात-२३०९/(७१/०९)/लपा-२, मुंबई-३२, दिनांक १२.०६.२००९ अन्वये रु.४०६६.०३३ लक्ष (दरसूची २००८-०९ वर आधारित) प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसूचीतील बदलामुळे झालेली वाढ भूसंपादन खर्चातील वाढ, संकल्पनातील बदल इतर कारणे व अनुषंगिक खर्चातील वाढ इत्यादी कारणामुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमतीच्या १०% हून अधिक वाढत असल्याने योजनेस पुन्हा सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :-**

विदर्भ पाटबंधो विकास महामंडळ आता या निर्णयान्वये पिंडकेपार लघु पाटबंधारे प्रकल्प, ता. गोंदिया, जि. गोंदिया या योजनेच्या एकूण अंदाजित किंमत रु.११००८.९३ लक्ष (एकशे दहा कोठी आठ लक्ष त्र्यान्नव हजार रुपये फक्त) खर्चास द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रु.१०४२६.८६ लक्ष (एकशे चार कोटी सव्वीस लक्ष पंच्यांशी हजार रुपये फक्त) कामाप्रित्यर्थ व रु.५८२.०७ लक्ष (पाच कोटी ब्यांशी लक्ष्च सात हजार) अनुषंगिक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामासाठी सन २०१६-१७ या वर्षाच्या दरसूची प्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतूदीचा गोषवरा परिशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

**ठळक बाबी :-**

| | | |
|---|---|---|
| अ) योजनेचे सिंचन क्षेत्र | ... | ११७० हेक्टर |
| ब) योजनेचे सिंचन क्षमता | ... | १३४५ हेक्टर |
| क) योजनेचे लाभव्यय गुणोत्तर | ... | ०.८४ (मापदंड १.०० पेक्षा जास्त) |

हा निर्णय संदर्भामध्ये उल्लेखित शासन निर्णयातील परिच्छेद १.३ नुसार तसेच नियामक मंडळाच्या दिनांक ४.१०.२०१८ रोजी संपन्न ७१ व्या बैठकीत मान्य झालेल्या ठराव क्र.७१/३ चे अनुषंगाने सचिव उपसमितीने व राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या तपासणी अहवालातील मुद्दा क्र.२६ व २७ च्या पुर्ततेच्या अटीच्या अधीन राहून महामंडळास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्रमांक ४७०२-५१०१ लघु पाटबंधारे वरील भांडवली खर्च ८०-सर्वसाधारण, १९०-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (००)(०५) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०२-५१०१) या लेखाशिर्षाखाली खर्च घालावा व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.